# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक २५ मार्च, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५, शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ व सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज ऊर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव —**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून शासनाच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारीला चालना मिळत असणे, महिलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, गँगवॉर, जबरी चोरी, खंडणी, गोळीबाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, सण-उत्सवांमध्ये वाढलेल्या तणावाच्या घटना, जातीय व धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्यामुळे राज्यातील सामाजिक सौहार्द धोक्यात आले असणे, राज्यात ड्रग माफिया, वाळू माफिया, भू-माफिया, अवैधपणे दारु विक्री करणारे आणि बोगस कंपन्यांमार्फत आर्थिक घोटाळे करणाऱ्या टोळ्यांना अभय मिळणे, बीड मधील मस्साजोगच्या सरपंचाची निर्घृण हत्या, परभणीत संविधान अवमान प्रकरणावरुन दोन गटांत दंगल, पोलीस कोठडीत एकाचा मृत्यू, बदलापूर येथे चिमुकलीवर शाळेतच शिपायाकडून झालेला अत्याचार, आरोपीचा पोलिसांकडून करण्यात आलेला एन्काऊंटर, पुणे येथील स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर झालेला बलात्कार, पुण्यात दिवसाढवळ्या कोयता गँगची दहशत, विशाळगड परिसरातील अतिक्रमण हटविण्यासाठी काढलेल्या मोर्चास लागलेल्या हिंसक वळणामुळे झालेले नुकसान, त्यातच लोकप्रतिनिधींचे त्यांच्या कार्यकर्त्यांना गुन्हेगारी करण्यास मिळत असलेले अभय, औरंगजेबाचा कबरीचा वाद निर्माण करुन नागपूर व इतर ठिकाणी दंगल घडवून समाजात तेढ निर्माण करणे, विविध खात्यातील अनियमितता व अनागोंदी कारभार, त्यामुळे अनेक निविदा रद्द करण्याचा

अप्रकाशित

घेतलेला निर्णयामुळे शासनाच्या कारभारावर निर्माण झालेले प्रश्नचिन्ह, यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये विविध महाविद्यालयांना दिलेली मंजुरी, परिचारकांच्या महाविद्यालयास देताना त्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने सूचविलेल्या महाविद्यालयांव्यतिरिक्त ४०० ते ५०० महाविद्यालयांना त्यासाठी असलेले नियम व निकष डावलून त्रुटी असलेल्या महाविद्यालयांना नियमबाह्यरित्या मंजूरी देवून केलेला भ्रष्टाचार, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षाचा अनुक्रमे एकोणचाळीसावा व चाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **सांस्कृतिक कार्य मंत्री** : "कोल्हापूर चित्रनगरी महामंडळ मर्यादित, कोल्हापूर यांचे सन २०१२-२०१३ ते सन २०१५-२०१६ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **कृषी मंत्री** : "डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने ) - [अनुक्रमांक (१) व (२)]**

(१) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"छत्रपती संभाजीनगर शहराला पाणीपुरवठा करणारी ९०० मिमी

अप्रधिकृत

व्यासाची जलवाहिनी टाकळी फाटा येथे निखळल्याने शहरात निर्माण झालेली पाणी टंचाई."

(२) **श्री.जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

"दिनांक २५ एप्रिल, २०२५ पर्यंत शालेय परीक्षा व संकलित मूल्यमापन चाचण्या आयोजित करण्याबाबतचा अकस्मात काढलेला आदेश सुधारित करणेबाबत."

(३) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १३ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

"सर्व स्तरावरुन आदेश पारित झालेले असतांनाही तसेच लाड पागे समितीचे शासनमान्य नियम २४० दिवस रोजंदारी काम करणाऱ्याला कायमस्वरुपी कामावर ठेवण्याबाबतचे निर्देश असतानाही याकडे होत असलेले दुर्लक्ष."

(४) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

" राज्यातील ६५ पेक्षा अधिक महाविद्यालयांनी 'बार कौन्सिल ऑफ इंडिया'ची मान्यताच घेतली नसल्याने हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान होणार असल्याबाबत."

(५) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर महिला व बालविकास मंत्री निवेदन करतील :-**

"संगमनेरमध्ये (जि.अहिल्यानगर) ६९२ बालके कुपोषित असल्याची गंभीर बाब, तसेच तालुक्यातील पोषण आहाराच्या वितरणात अनियमितता असेण, ग्रामपंचायती आणि स्थानिक प्रशासनाने जबाबदारीने काम न केल्याने ही परिस्थिती निर्माण होणे, त्यामुळे आहार व्यवस्थापनात पारदर्शकता आणणे आणि अंगणवाडी सेविकांच्या कामकाजाची नियमित तपासणी करुन सुधारणा करण्याबाबत. "

अग्रिम प्रत

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**
**(सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **सर्वश्री जयंत आसगावकर,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री. धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील लोकप्रतिनिधी यांनी माध्यमिक विद्यालय-शिरगाव, वारू कोथूर्णे माध्यमिक विद्यालय-कोथूर्णे, भैरवनाथ माध्यमिक विद्यालय-घोनशेत, माध्यमिक विद्यालय-सांगिसे, स्व.वामनराव हैबतराव देशमुख माध्यमिक विद्यालय-देवघर या शाळांना विद्यार्थी पटसंख्येचे कारण देत दिनांक १ नोव्हेंबर, २०२० पासून ४० टक्के व दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून ६० टक्के अनुदानासाठी अपात्र ठरविणे, संपूर्ण मावळ तालुका हा डोंगरी भागात येत असून शासन निर्णयानुसार डोंगरी भागातील शाळांना शेवटच्या वर्गातील पटसंख्या २० असणे अपेक्षित, सदर शाळांच्या शेवटच्या वर्गात संच मान्यतेनुसार २० पेक्षा जास्त पटसंख्या असून शासन निर्णयाप्रमाणे ती पटसंख्या पुरेशी असणे, सदर शाळांच्या अनुदान प्रस्तावासोबत मावळ तहसीलदारांचा दाखला असणे, परंतु शहरी भागासाठी लागू असलेले निकष या शाळांसाठी ग्राह्य धरून पटसंख्येचे कारण देत सदर शाळा अपात्र ठरविणे, या शाळा सन २०१६ पासुन २० टक्के अनुदान घेत असताना सध्या या पाचही शाळांमधील कर्मचारी सुमारे २६ महिने ४० टक्के तर १० महिने ६० टक्के अनुदानापासून वंचित असणे, सुधारित अनुदानाकरिता सदर प्रस्ताव शिक्षण आयुक्त, पुणे यांच्या शिफारसीने शासनाकडे सादर केले असताना मान्यतेकरीता शासनाकडे प्रलंबित असणे, शासकीय अधिकाऱ्यांच्या चुकीच्या अहवालामुळे अपात्र ठरलेल्या या पाच शाळांना ६० टक्के अनुदान देणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री इद्रिस नायकवडी,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, **वि.प.स**. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दिवसेंदिवस ऑनलाईन जुगारातून कमीवेळात पैसे कमविण्याचे आमिष दाखवून युवकांना गंडविण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढणे, याबाबत

अप्रकाशित प्रत

अनेक तक्रारी विविध पोलीस स्थानकात दाखल असणे, भिवंडी येथील (जि.ठाणे) एका तरुणाची शेअर मार्केटच्या नावाखाली तब्बल १.४५ कोटी रुपयांची केलेली फसवणूक, त्यांनी www.funrep.net आणि www.Playrep.net (रॉलेट) हे शेअर असून त्यामध्ये पैसे गुंतवायचे याबाबत सांगण्यात येऊन त्या तरुणाच्या नावे लॉगिन आय.डी.व पासवर्ड तयार करुन देणे, सदर बेवसाईट ही ऑनलाईन गेम किंवा जुगार असल्याचे न सांगता शेअर मार्केटमधील शेअर्स असल्याचे सांगून त्या तरुणाची केलेली आर्थिक फसवणूक, यामध्ये २० ते ५० हजार कोटीची वार्षिक उलाढाल होत असून यातून शासनाला कोणताही कर मिळत नसणे, यात शासनाची होत असलेली फसवणूक,सदर प्रकरणी त्या तरुणाने पोलीस आयुक्त, ठाणे शहर, अतिरिक्त पोलीस आयुक्त, गुन्हे अन्वेषण शाखा, ठाणे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, भिंवडी, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, भिवंडी शहर पोलीस स्टेशन यांचेकडे दिनांक ४ ऑक्टोबर, २०१४ रोजी व त्यानंतरही वारंवार लेखी तक्रारी दाखल केलेल्या असणे, तथापि अद्याप उक्त प्रकरणी कोणतीच चौकशी वा कारवाई न होणे, परिणामी रोलेट या ऑनलाईन जुगाराच्या माध्यमातून अवैध धंदे थाटून हजारो तरुणांची व त्यांच्या कुटुंबियांची होत असलेली आर्थिक फसवणूक, आर्थिक फसवणूक झालेल्या ७० पेक्षा जास्त तरुणांनी केलेल्या आत्महत्या, त्यामुळे अनेक गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांचे कुटुंबे उध्वस्त होणे, शासनाने या सर्व प्रकरणाची सीबीआय / एसआयटीमार्फत पारदर्शक चौकशीकरुन फसवणूक करणाऱ्या आरोपींच्या टोळीवर गुन्हा दाखल करुन कठोर कारवाई करण्याची तसेच ज्यांची फसवणूक झाली आहे त्यांचे पैसे मिळवून देण्याची व असे अवैध धंदे कायमस्वरुपी बंद करण्याबाबतची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील बोरिवली (पूर्व) येथे मदरसा हबीबीया रीझविया ट्रस्ट ही धार्मिक शिक्षण, नमाज पठण, धार्मिक संस्कार इ. मध्ये कार्यरत संस्था असणे, या मदरसाची अनेक मुस्लीम बांधव धार्मिक भावनेने जोडलेले असणे, सध्या या संस्थेच्या संचालक मंडळावर काही गुन्हेगारी स्वरुपाच्या व्यक्ती असणे, या संस्थेच्या जागेवर सध्या पुनर्विकासाचे काम सुरु करणे, त्यासाठी विकासकाबरोबर करार केला असणे, या विकासकाने या संस्थेच्या जागेवर कमर्शिअल संकूल दाखवून संस्थेशी केलेला पूर्वीचा करार बेकायदेशीरपणे रद्द

करणे व संस्थेचे पदाधिकारी पद दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी संपलेल्या व्यक्तींशी बोगस कागदपत्रे दाखवून नव्याने करार करुन संस्थेची फसवणूक करणे, बोगस ऑडिट दाखविणे, या प्रकारामुळे या ट्रस्टचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असणे, विकासकाने केलेल्या करारानूसार नमूद केलेल्या जागेवर कमर्शियल संकुल दाखवून पुर्वीचा करार रद्द करुन ट्रस्टची फसवणूक करणे, विकासकाने रेकॉर्डवर कार्यरत नसलेल्या तसेच ज्यांचा कालावधी संपुष्टात आलेला आहे अशा ट्रस्टीमार्फत खोटा ठराव मंजूर केल्याचे भासवून पुर्वीचा कायदेशीर करार पुर्वीच्या ट्रस्टींना न कळविता रद्द केल्यामुळे हजारो मुस्लीम बांधवाच्या भावना दुखावल्या असून सर्वांची फसवणूक केल्यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन गैरकायदेशीरपणे बोगस कागदपत्रांच्या माध्यमातून फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासक व संबंधित अधिकारी यांचेवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावाची कार्यवाही व उपाययोजना. "

(४) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मध्यप्रदेश-जळगांव जिल्ह्यातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३-एल. बोरगांव बुजुर्ग ते मुक्ताईनगर रस्त्यांचे चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करणे प्रस्तावित असणे, महामार्गालगतच्या सर्वच गावांचे भूसंपादनाचे निवाडे घोषीत करणे, निवाडे करतांना केंद्र शासनाच्या कायद्यांचा विचार न करता मुल्यांकन करणे, भूसंपादन करताना राज्य शासनाने काढलेल्या शासन निर्णयाच्या आधारे मुल्यांकन करणे, शासन निर्णय हे केंद्र सरकारच्या कायद्याशी विसंगत असणे, पूर्वी याच क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र.६ चे भूसंपादनापेक्षा शेतकऱ्यांना कमी दर देणे, परिसरातील रेडीरेकनरचा दर विचारात न घेता कालबाह्य झालेल्या बेल्टिंग मेथड ने मुल्यांकन निश्चित करणे, लवाद कायद्यामध्ये दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजु मांडण्यांची संधी न देणे, भूसंपादन कायदा सन २०१३ चे कलम २६ नुसार मागील ३ वर्षाचे खरेदी-विक्रीचे व्यवहार विचारात घेणे बंधनकारक असतांना कायद्याचे विसंगत शासन निर्णयावर आधारित एक वर्षाचे व्यवहारावर मुल्यांकन ठरविणे, ग्रामीण भागात जास्त तर नगरपंचायत क्षेत्रात कमी, एकाच क्षेत्रात प्रथम निवाड्यात रु.४५/- प्रती चौरस मिटर तर द्वितीय निवाड्यात त्याच क्षेत्रास त्याच शेतकऱ्याला रु.९२०/- प्रती चौरस मिटर चा दर देणे, बागायती क्षेत्राला मिळणारा कवडी मोल भाव, वाढीव मोबदला

मिळणेसाठी केलेले आंदोलन, चौपदरीकरणाचे काम बंद करणे, शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, भूसंपादनाचे फेरमुल्यांकन करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सन १९९७ साली घोषित झालेल्या कळमोडी मध्यम प्रकल्पातील उपसा योजना अद्याप कार्यरत झालेली नसणे, याबाबत खेड व आंबेगाव तालुक्यातील ५०६५ हेक्टर क्षेत्रासाठी प्रस्तावित असलेल्या मूळ योजनेत कळमोडी धरणा जवळील व खेड तालुक्याच्या पूर्व भागातील १५५७ हेक्टर क्षेत्राचा समावेश करण्याबाबतचा अहवाल जलसंपदा विभागाने शासनास सादर केलेला असणे, चासकमान धरणाच्या कालव्यावर अवलंबून असलेले सिंचन क्षेत्र नागरिकीकरण व औद्योगीकरण यामुळे कमी झालेले असणे, चासकमान कालव्याद्वारे वितरित होत असलेल्या पाण्याचे सर्वेक्षण व त्या आधारे फेरनियोजन करून कळमोडी धरणाचे चासकमान धरणासाठी राखीव ठेवलेले १.०७ टीएमसी पाणी जर उपसा योजनेला दिले तर खेड आंबेगाव व शिरूर तालुक्यातील १० ते १२ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन ही गावे दुष्काळमुक्त होतील, याबाबत शासनाने तांत्रिक बाबीची पूर्तता करून जलसंपदा विभागाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावास तातडीने मंजूर देण्याची आवश्यकता निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **श्रीमती चित्रा वाघ,** सर्वश्री प्रसाद लाड, प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना किटक नाशके, औषधांची फवारणी निर्यात करताना त्याबाबत घ्यावयाची काळजी इत्यादी बाब शेतकऱ्यांना कृषी विज्ञान विद्यापीठाकडून अवगत करण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा आंबा व काजू निर्यात फुलोरा अवस्थेत असताना त्यावर कुठली किटक नाशके औषधे फवारणी करावी जेणेकरुन निर्यात करताना त्यात अडचणी येणार नाहीत, याबाबत शेतकऱ्यांना संबंधित विद्यापीठाकडून योग्य ते मार्गदर्शन

होत नसल्यामुळे शेतकऱ्यांचा माल निर्यात न होता तसाच पडून राहणे, तसेच सदरचे उत्पादन हे नाशवंत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे आंबा पीक सडून जाणे, यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत येणे, आंबा उत्पादकांसमोर फुल कीडा / फळ माशीचे संकट उभे असताना त्याचा योग्य देखभाल करण्यासाठी तसेच आंब्याचा दर्जा उंचावण्यासाठी कृषी विज्ञान विद्यापीठाकडून शेतकऱ्यांना वेळीच मार्गदर्शन करणे आवश्यक असताना तसेच विद्यापीठाकडून वेळीच मार्गदर्शन होत नसल्यामुळे शेतकऱ्यांना विद्यापीठ प्रशासनाच्या विरुध्द निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, राज्यात शेतकऱ्यांच्या आंबा व काजू पीकाचे निर्यात सुकर व्हावी यासाठी विद्यापीठाकडून शासनाने निदेश देऊनही त्यावर तातडीने कार्यवाही करुन शेतकऱ्यांना न्याय देण्याची होत असलेली मागणी, ही मागणी पूर्ण होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **ॲड.अनिल परब,** सर्वश्री सत्यजीत तांबे, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **परिवहन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात दिनांक १ एप्रिल, २०१९ पूर्वीच्या सर्व जुन्या वाहनांना आता "हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट" लावणे सक्तीचे करणे, सदर नंबर प्लेट (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन) लावण्याचे बेकायदा कंत्राट राज्यातील मंत्रीमंडळ अस्तित्वात येण्यापूर्वीच परिवहन विभागातील अधिकाऱ्यांनी तीन कंपन्यांना देणे, कंपन्यांचा लाभ लक्षात घेऊन नंबर प्लेट लावण्याचे काम बेकायदा कंपन्यांना दिल्यामुळे सामान्य वाहनचालकांना बसलेला फटका, महाराष्ट्रात एचएसआरपी नंबर प्लेट लावण्याकरिता दुचाकी मालकाला ४५० रुपये द्यावे लागणे, तर गुजरातमध्ये याच कामाकरिता फक्त १६० रुपये द्यावे लागणे, राज्यात जवळजवळ २ कोटी होऊन अधिक वाहने असून आरटीओच्या दरानुसार नंबर प्लेट लावण्यास उक्त बेकायदा तीन कंपन्यांना १५०० कोटी रुपये लाभ मिळण्याची शक्यता वर्तविण्यात येणे, उक्त बेकायदा कंत्राट व सर्व जुन्या वाहनांना आता "हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट" लावणे सक्तीचे करणे तसेच सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून आरटीओची जाचक एसओपी तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

अप्रकाशित प्रत

(८) **श्री.किशोर दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेने १ हजार ६० प्राथमिक शेती व आदिवासी संस्थांमार्फत ९९ हजार सभासदांना १ हजार ७३४ कोटी शेती कर्ज पुरवठा केला असणे, यापैकी ५६ हजार थकबाकीदारांकडे १३१३ कोटीची थकबाकी असून त्यात १ हजार २४ कोटी रूपये एनपीए झाले असल्याने बँकेच्या ११ लाख ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या असणे, यामुळे नाशिक जिल्हा सहकारी बँक आर्थिक अडचणीत येत असल्यामुळे शेतकऱ्यांना बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार १०१ च्या नोटीसा देण्यात येणे, नोटीसा दिल्यानंतर बँकेच्या कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना ओटीएसच्या अनुषंगाने कर्ज भरण्यास सांगण्यात येणे, दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत शेतकऱ्यांनी थकीत रक्कम न भरल्याने शेतकऱ्यांच्या बांधावरती जाऊन बँकेच्या कर्मचारी व सहकारी विभागाने पंचनामा करून मालमत्तेचे मुल्यांकन करून जाहीर लिलावास काढण्यात येणे, परंतु मोठ्या थकबाकीदारांकडून कर्जवसूली धिम्या गतीने होत असल्याने फक्त शेतकऱ्यांवर अन्याय होऊन भूमिहीन होण्याची शक्यता निर्माण झाल्याने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

## -मध्यंतर-

**सहा : म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

**(शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ व सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) [अनुक्रमांक (१) व (२)]**

(१) **सर्वश्री इद्रिस नायकवडी,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, **वि.प.स यांची म.वि.प.** नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –

"राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिपायांची पदे व्यपगत करण्यात आली असून त्याऐवजी शिपाई भत्ता त्यांना अनुज्ञेय करण्यात आलेला असणे, तथापि, शिपाई भत्ता अत्यंत अपुरा असून त्याऐवजी कर्मचारी उपलब्ध होत नसणे, तसेच तात्पुरत्या स्वरुपातील कर्मचारी हा शासनाची जबाबदारी स्वीकारीत नसणे, त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना जबाबदार

धरता येणे शक्य नसणे, राज्यातील शाळांमधील संरक्षणाचा प्रश्न अत्यंत गंभीर असणे, त्यामुळे शिपायांची पदे नियमित करण्याबाबत कारवाई करणे, तसेच बदलापूरसारख्या (जि.ठाणे) घटना घडल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या संरक्षणांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री विक्रम काळे,** सतिश चव्हाण, शिवाजीराव गर्जे, **वि.प.स यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"राज्यामध्ये मराठी ही आमची मातृभाषा केंद्रशासनाने नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला असणे, परंतु, या महाराष्ट्र राज्यामध्ये मराठी शाळांवरच गंडांतर येत असणे, मराठी शाळांना टाळे लागणार की काय अशी भिती निर्माण होणे, इंग्रजी शाळांच्या वाढत्या संख्येमुळे राज्यातील मराठी शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश संख्या कमी होणे, शाळांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना आधारकार्डची सक्ती करणे, त्यानंतर आधार असलेल्या विद्यार्थ्यांचे आधारकार्ड व्हॅलीड असले पाहीजे, याची सक्ती करणे, अनेक विद्यार्थ्यांच्या आधार कार्डात काही दोष असल्यामुळे तसेच विद्यार्थी वर्गात प्रवेशीत असूनही व त्याचे आधार कार्ड असतांनाही विद्यार्थी इनव्हॅलीड होणे, परिणामी त्या त्या शाळेतील संख्या कमी होणे, त्याचा परिणाम संच मान्यतेवर होणे, परिणामी शिक्षक-कर्मचारी अतिरिक्त होण्याची भिती निर्माण होणे, संचमान्यता ऑनलाईन असल्यामुळे व त्याचे काम पुण्याहून होत असल्यामुळे अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या असूनही संबंधीत शाळांना सदोष संचमान्यता मिळणे, त्याच्या दुरुस्तीसाठी शाळावाल्यांना पुण्याला वारंवार चकरा माराव्या लागणे, या संच मान्यता दुरुस्त न झाल्याने त्या संस्थांचे रोस्टर तपासून न मिळणे, परिणामी पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती करण्यासाठी त्यांची संधी हुकणे, नुकत्याच दिनांक १५ मार्च, २०२५ च्या संच मान्यतेच्या शासन निर्णयामुळे अजुन संकटात भर पडणे, निकषांनूसार पटसंख्या होत नसल्याने अनेक शाळा बंद पडण्याची भिती निर्माण होणे, त्यामुळे पुर्वी प्रमाणे २० पटाखालील वर्गासाठी एक शिक्षक असा निकष कायम ठेवणे, परिणामी संच मान्यतेच्या निकषात सर्व समावेषक बदल करणे गरजेचे असणे, शासनाने दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ रोजी अनुदानास पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वर्गतुकड्यांना २०% अनुदान, २०% व ४०% अनुदान घेत असलेल्या शाळांना ६०% व ८०% असा पुढील टप्पा देण्याचा निर्णय घेणे, परंतु, गेल्या दोन अधिवेशनात व आता अर्थसंकल्पात त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचा निर्णय न होणे, यापुढे टप्पा अनुदानावर आलेल्या शाळांना प्रचलित धोरणानूसार १००%

अप्रसिद्ध

अनुदान देण्याबाबत निर्णय करण्याची गरज असणे, आजपावेतो सन २०१८ मध्ये शेवटच्या वर्गात ३० पटसंख्या नसल्यामुळे, शिक्षक मान्यतेची कागदपत्रे जुळत नसल्यामुळे, चुकीच्या संच मान्यतेमुळे आजपावेतो राज्यातील शेकडो शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांना व वर्गतुकड्यांना जाहीर केलेले अनूदान वितरीत न होणे, आजही मुल्यांकनाअभावी तसेच मुल्यांकन पुर्ण झालेल्या शाळांनासूध्दा शासन निर्णयाप्रमाणे अनुदान मिळणे गरजेचे असणे, राहिलेल्या शाळांना यापुढे स्वयंअर्थसहाय्यीत करण्याचा निर्णय मागे घेणे गरजेचे असणे, १००% अनुदानीत शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात सेवानिवृत्तीने शिक्षकाचे पद रिक्त झाल्यास त्याच संस्थेच्या इतर शाखेत विनाअनुदानवर किंवा टप्पा अनुदानावर कार्यरत शिक्षकाची बदली १००% अनुदानित पदावर बदली करण्याचे पुर्वीप्रमाणे शिक्षण अधिकारी व उपसंचालकाला अधिकार देण्याबाबत नुकताच न्यायालयाने निवाडा देणे, परंतु, त्यावर शासनाचा निर्णय न होणे, परिणामी, संबंधीत कार्यरत शिक्षकावर अन्याय होणे, सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता तातडीने अंतिम करुन अतिरिक्त होणाऱ्या शिक्षक-कर्मचाऱ्यांची समायोजन होणे व त्यानंतर रिक्त राहणारी शिक्षक-कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत ठोस कृती कार्यक्रम करण्याची गरज असणे, कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त शिक्षकांना सेवेत घेण्याचा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्याची गरज असणे, शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा व कुटूंबाशी निगडीत असलेला दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या व त्यानंतर सेवेत आलेल्या सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेण्याची गरज असणे, खाजगी शाळांना सरकारी शाळांचा दर्जा देण्याबाबत राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केलेल्या प्रस्तावाचे नेमके स्वरुप राज्यातील सर्व शिक्षण प्रेमींना कळणे गरजेचे असणे, उर्दु माध्यमांच्या शाळेमध्ये मराठी भाषा फाऊंडेशन शिकवण्यासाठी मानसेवी शिक्षक नेमण्यासाठी विद्यार्थी संख्येची अट शिथील करण्याची गरज असणे, राज्यात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षक-कर्मचाऱ्यांना तसेच मानव विकास शिक्षकांना इतर शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणीत वेतन मिळणे गरजेचे असणे, वर्षानुवर्षे सुरळीतपणे सुरु असलेला शैक्षणिक वर्षाचा कालावधी माहे जून ते ३० एप्रिल असाच ठेवणे भौतिकदृष्ट्याही गरजेचे असणे, शिक्षक-कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण पूर्वीप्रमाणेच ऑनलाईन पध्दतीनेच देणे गरजेचे असणे, शिक्षकांवरील अध्यापनाशिवाय असलेला इतर सर्व कामांचा बोजा कमी करणे गरजेचे असणे, शाळांची व्यवस्थापन गुणवत्तापूर्ण होण्यासाठी त्या-त्या जिल्ह्याला आवश्यक

अग्रिम प्रत

असलेले आधिकाऱ्यांचे मनुष्यबळ पुरविणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३१ — महाराष्ट्र खाजगी पदयोजन एजन्सी (विनियमन) विधेयक २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**आठ : भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त "भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृत महोत्सवी वाटचाल " या विषयावर चर्चा.**

**नऊ : (मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५, बुधवार, १९ मार्च, २०२५, गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५, शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ व सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) - (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री प्रसाद लाड, विक्रम काळे, सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री कृपाल तुमाने, श्रीकांत भारतीय, अमोल मिटकरी, किशोर दराडे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री किरण

अप्रकाशित

सरनाईक, पंकज भुजबळ, राजहंस सिंह, शिवाजीराव गर्जे, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, सदाशिव खोत, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, सर्वश्री अमरीशभाई पटेल, धर्मगुरु बाबुसिंग राठोड, रणजितसिंह मोहिते-पाटील, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"नागपूर कराराचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेऊन नागपूरसह विदर्भाच्या विकासाला चालना देण्याकरिता विद्यमान शासन कटीबध्द असणे, नागपूर जवळील मिहानमध्ये सेझअंतर्गत पायाभूत सुविधा निर्माण झाल्याने बोईंगच्या एमआरओसह अनेक उद्योगांनी नागपूरात येण्यास स्वारस्य दाखविल्याचे निदर्शनास येणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळाचे अद्ययावतीकरण आणि विस्तारीकरण हा नागपूरच्या विकासाचा मैलाचा दगड ठरणार असणे, विस्तारित विमानतळाच्या माध्यमातून ९,००,००० टन क्षमतेच्या कार्गोची हाताळणी होणार असणे, परिणामी, नागपूर विमानतळ मध्य भारतातील गेम चेंजर म्हणून सिध्द होणार असणे, नवीन विमानतळ ३,००,००० स्क्वे. फूट क्षेत्रात बांधले जाणार असल्याने व सध्याच्या धावपट्टीच्या शेजारी आणखी ६० मीटर रुंद आणि ४ हजार मीटर लांबीची धावपट्टी बांधण्यात येणार असल्याने तेथे एकाच वेळी १०० विमाने उभी राहण्याचे प्रयोजन असणे, मोठ्या औद्योगिक टाऊनशीपला लागून असलेले कार्गो हब आणि मोठे विमानतळ ही रचना विदर्भातील भविष्याच्या विकासाचे द्योतक ठरणार असणे, विमानतळाच्या विस्तारामुळे येथून होणाऱ्या माल वाहतुकीची क्षमता वाढल्याने विदर्भातील सर्व उत्पादनांची निर्यात होण्यास गती मिळणार असणे व त्यामुळे सुमारे १ लाख लोकांना रोजगार उपलब्ध होणार असणे, रस्ते, रेल्वे, विमानतळ विकास यामुळे विदर्भ लॉजिस्टीक हब म्हणून विकसित होणार असणे, माहे जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये, ६३ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये इतक्या गुंतवणूकीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्याने महाराष्ट्र हे थेट परकीय गुंतवणूकीसाठी पसंतीचे राज्य असल्याचे स्पष्ट झाले असणे, देशातील एकूण थेट परकीय गुंतवणूकीच्या २९टक्के गुंतवणूक राज्यात आली असणे, परिणामी, राज्यात १५ लाखांपेक्षा अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे, राज्य शासन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्यात सुमारे ५ हजार कोटी रुपये गुंतवणूकीचा सामंजस्य करार करण्यात आल्याने ४० हजार रोजगारांची निर्मिती होणे अपेक्षित असणे, मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील विकास केंद्राबाबत कैलिफोर्नियातील बर्कले युनिव्हर्सिटी समवेत सामंजस्य करार करण्यात येणे, सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्याबाबतीत महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य राज्य ठरले असणे,

अप्रकाशित प्रत

राज्यात मुंबई, पुणे व छत्रपती संभाजीनगर येथे जी-२० च्या विविध बैठका यशस्वीरित्या आयोजित करण्यात आल्या असणे, औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्यातील विविध उद्योगांना सुमारे ६ हजार कोटी रुपये इतके गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार असणे, राज्यातील औद्योगिकीकरणाला पाठबळ व प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सुमारे ३,५०० एकर इतके औद्योगिक भूखंड वितरित करण्याचा निर्णय घेण्यात येणे, पुरवठा साखळीची कार्यक्षमता सुधारण्यासाठी आणि जागतिक दर्जाची व्यवसाय परिसंस्था निर्माण करण्यासाठी १० एकात्मिक औद्योगिक केंद्रे व एकात्मिक माल वाहतूक केंद्रे विकसित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असणे, सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये, बेरोजगार युवकांना उद्योगांशी जोडण्यासाठी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी राज्यात जिल्हा स्तरावर ६११ 'पंडीत दीनदयाल रोजगार मेळावे' आयोजित केले असणे, त्यायोगे १९ हजारांपेक्षा अधिक उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यातील जनतेचे आरोग्य सदृढ ठेऊन प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम् सुखसंपदा' उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने 'महात्मा जोतीराव फुले जनआरोग्य योजना' व 'आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना' या एकत्रित योजनेंतर्गत लाखो रुग्णांवर शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या असणे, राज्यात ३० वर्षांवरील सर्व महिलांचे कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, मोतीबिंदू, कान, नाक, घसा व इतर आजारांचे निदान व उपचार याकरिता राज्य शासनातर्फे प्रति जिल्हा २ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असणे, राज्यात शुन्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलां-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागरुक पालक, सदृढ बालक' हे अभियान राज्यभर राबविण्यात येणे, राज्यात ग्रामीण तसेच दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना प्रत्येक छोट्या आजारासाठी हॉस्पीटलमध्ये जाऊ लागू नये याकरिता 'हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या योजनेंतर्गत महाराष्ट्रात ७०० दवाखाने सुरु करण्यात येणे, राज्यात विविध महापालिका व जिल्हा परिषदेतील औषधे, वैद्यकीय उपकरणे खरेदीतील अनियमिततेला पायबंद घालण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात येणे, राज्यातील रस्ते, बंदरे, विमानतळ, रेल्वे, मेट्रो, वीज इ. पायाभुत सुविधा विकास क्षेत्रांसाठी निधी उभारणे आणि प्रकल्प राबविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणाखाली 'महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ' स्थापन करण्यात येणे, सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावरील कामे या महामंडळामार्फत करण्याचे प्रयोजन असणे, या योजनेंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नागपूर येथील महाराष्ट्र नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीची इमारत, नागपूर जिल्हा न्यायालयाची विस्तारित इमारत, मुंबईतील माझगाव न्यायालयाची

इमारत, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाची इमारत, जलभूषण बंगला, राजभवन इ. इमारतींचे बांधकाम अलीकडेच पूर्ण करण्यात येणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व योजनांचे संनियंत्रण करण्यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (PMIS) ही संगणकीय प्रणाली विकसित करण्यात येणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्याचे सहापदरी रुंदीकरण करण्यासाठी ५६१.८५ कोटी रुपयांच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, नाबार्ड-२८ अंतर्गत १,०३०.५२ कोटी रुपयांच्या ३८२ कामांना नाबार्ड करून मंजुरी प्राप्त झाली असणे व राज्य शासनाने देखील त्यास प्रशासकीय मान्यता दिली असणे, सर्व समाज घटकांना सोबत घेऊन, सर्वसमावेशक, प्रगतीशील, पुरोगामी व विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : अर्धा-तास चर्चा – म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) –**

**(मंगळवार, दिनांक ४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक १]**

(१) **सर्वश्री सत्यजीत तांबे**, विक्रम काळे, किशोर दराडे, **वि.प.स.**

**"जळगाव शहराच्या परिसरात प्लास्टिकचा पुनर्वापर करणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन देण्याबाबत"** या विषयावरील श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचा दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ६ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक २३०५२ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(गुरुवार, दिनांक ६ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु प्रलंबित असलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) [अनुक्रमांक २ ]**

(२) **सर्वश्री सत्यजीत तांबे**, विक्रम काळे, किशोर दराडे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"इंडियाबुल्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीस सिन्नर औद्योगिक क्षेत्रामध्ये केंद्र शासनाच्या सेझ अधिनियम, २००५ अन्वये २६०० एकर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिले असणे, मात्र कंपनीने विहित

मर्यादेत या ठिकाणी विकास केला नसणे, १८ वर्षानंतरही या ठिकाणी उद्योग न उभारल्यामुळे ही जमीन परत घेऊन स्थानिक उद्योजकांना फेर वाटप करण्याची गरज असणे, याबाबत उद्योग मंत्री यांच्यासमवेत बैठक झाली असून या बैठकीचे इतिवृत्त सुद्धा तयार करण्यात आलेले नसणे, तसेच जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या समवेत सुद्धा मा. प्रतिनिधींनी बैठक घेतली असणे, या मागणीचा मा. सदस्यांकडून गेल्या २ वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करुन शासनाकडे पत्रव्यवहार केला असणे, सन २०२३ मध्ये याबाबत विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून चर्चा उपस्थित करूनही कार्यवाही होत नसल्याने शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ३ व ४]**

(३) **सर्वश्री सत्यजीत तांबे,** विक्रम काळे, किशोर दराडे, **वि.प.स.**

"**महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतंर्गत असलेली रुग्णालये राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये उपलब्ध करण्याबाबत**" या विषयावरील श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांचा दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ९ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक २३७५१ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, **वि.प.स.**

"**राज्यातील धर्मादाय रुग्णालयांच्या मनमानी कारभाराबाबत**" या विषयावरील ॲड. अनिल परब, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३६१५ ला दिनांक २७ जून, २०२४ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(बुधवार, दिनांक १९ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ५ व ६]**

**(५)** **सर्वश्री अमोल मिटकरी**, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात बोगस डॉक्टरांचे प्रमाण वाढत असणे, आदिवासी भागातील वाड्या वस्त्यांवर तसेच शहरी भागातील झोपडपट्ट्यांमध्ये बोगस डॉक्टरांकडे कोणतीही प्रमाणित वैद्यकीय पदवी नसताना अशा ठिकाणी आपले दवाखाने सुरु करुन व्यवसाय करीत असणे, रुग्णांवर चुकीच्या पध्दतीने उपचार करुन त्यांचे आरोग्य धोक्यात आणणे, अनेक ठिकाणी रुग्णांना चुकीच्या पध्दतीने उपचार केल्यामुळे नाहक जीव गमवावा लागत असणे, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने (इंडियन मेडिकल असोसिएशन) देखील राज्यातील प्रत्येक गाव बोगस डॉक्टरांच्या विळख्यात अडकले असून त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पुरेशी यंत्रणा कार्यरत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून देणे, राज्यातील बोगस डॉक्टरांकडे कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना असंख्य रुग्णांवर उपचार करुन त्यांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या अशा बोगस डॉक्टरांवर शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना"

**(६)** **श्री. विक्रांत पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर,** वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्य शासनाने सिडकोला नैना प्रकल्पांतर्गत २५६ गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून नेमले असणे, सिडकोने १२ टाऊन प्लॅनिंग स्कीम (टीपीएस) शासनाकडून मंजुर केल्या असल्या तरी स्थानिकांचा या संपूर्ण प्रकल्पाला विरोध असल्याने यामध्ये कोणताही विकास करण्यास सिडको अद्यापपर्यंत असमर्थ ठरणे, नवी मुंबई लगत २५६ गावांना अंतर्भूत करून सुमारे ६७० चौ .मी.कि. क्षेत्रावर नैना प्रकल्पाची योजना आखली असणे, या योजनेत शेतकऱ्यांच्या जमिनी बाजारभावाने संपादित न करता त्यांच्याकडून सुरुवातीला १०० टक्के जमिनी संपादित करून त्यांना ६० टक्के विकसित जमिनी परत करण्यात येणार असणे, त्यानंतर सिडकोने यामध्ये बदल करून ६० टक्के जमिनी परत करण्याऐवजी ४० टक्के जमिन परत करण्याची योजना मंजुर असणे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी यास विरोध केला असून येथील ९५ गावांतील नागरिकांनी समिती

स्थापन करून त्याविरुद्ध न्यायालयीन लढाई लढण्याची तयारी केली असणे, नैना विकास योजनेत सिडको हे नियोजन प्राधिकरण असल्याने त्यांनी मंजुर केलेल्या विकास योजनेत स्थानिकांच्या जमिनीवर आरक्षण केल्यामुळे गत १२ वर्षे स्थानिकांना त्यांच्या हक्कापासून सिडकोने वंचित ठेवल्याचा आरोप प्रकल्पग्रस्त करित असणे, सिडको हे फक्त नियोजन प्राधिकरण असून सिडकोकडे स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी कोणतेही जमिनीचे मालकी हक्क हस्तांतरित केलेले नसल्याने सिडको या क्षेत्रात कामे करू शकत नसणे, सिडकोने ही कामे स्थानिक ठेकेदारांमार्फत करण्याचे ठरवून निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीची शासनाने चौकशी करून करावयाची कार्यवाही वा उपाययोजना".

**(गुरुवार, दिनांक २० मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ७ व ८]**

**(७)** **सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे,** जगन्नाथ अभ्यंकर, किशोर दराडे, **वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र राज्यातील सेवेत असताना दिवंगत किंवा अकाली सेवानिवृत्त झालेल्या खाजगी अनुदानित व विनाअनुदानीत शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास दिनांक ३१ डिसेंबर, २००२ रोजीच्या शासन आदेशान्वये अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबतचे धोरण असणे, सदर धोरणामध्ये मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना कर्मचारी ज्या संस्थेत सेवेत होता त्या संस्थेत किंवा शासनाने सुचवविलेल्या संस्थेत रिक्त पदावर नियुक्ती करण्यात येणे, अशा एखाद्या मृत शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या वारसाकडे शिक्षकाची पदवी असल्यास त्यास शिक्षक पदी नियुक्ती करण्यात येणे, दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन आदेशानुसार जे शिक्षक अनुकंपा तत्वावर नियुक्त झाले आहेत त्यांना शासनाने टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य केले असणे, TET/CTET परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांची सेवा रद्द करण्यात यावी अशा प्रकारची जाचक अट टाकली असणे, अनुकंपा तत्वावर नियुक्त झालेल्या शिक्षकास अशा प्रकारची अट शिथिल करण्याबाबत शसनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८)** **ॲड.अनिल परब**, सर्वश्री. सुनिल शिंदे, सचिन अहिर, **वि.प.स.** पुढील

सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती गत तीन वर्षांपासून पूर्णपणे विस्कटल्याने महामंडळाचा अनागोंदी कारभार रोज समोर येत असणे, महामंडळाने १४.९५ % भाडेवाढ केल्यानंतर दररोजचे १ लाख प्रवासी कमी झाल्याचे निदर्शनास येणे, माहे जानेवारी, २०२५ अखेर ५७२.०५ कोटी रूपये भांडार खरेदीवर खर्च करूनही तांत्रिक बिघाडामुळे बसेस बंद पडणे, बस उपलब्ध नसल्यामुळे ग्रामीण जनतेची गैरसोय होणे, भांडार अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे त्या खात्याचे तत्कालीन महाव्यवस्थापक तसेच छत्रपती संभाजीनगर येथील वरिष्ठ भांडार अधिकारी यांची गत काही महिन्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केलेली असणे, महामंडळाचे तत्कालीन महाव्यवस्थापक (वाहतूक) यांच्या मुलीच्या लग्नात सिटीकॅश कंपनीचे मालक यांनी त्यांच्या क्रेडिट कार्डवरून हॉटेलमधील खोल्यांचे भाडे भरल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे होणे, महामंडळाचा माहे जानेवारी, २०२५ अखेर संचित तोटा १०,९६२.४० कोटी रुपये इतका वाढणे, दरमहा येणाऱ्या आर्थिक तुटीच्या रकमेएवढे अर्थसहाय्य शासनाने देण्याबाबतच्या दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीचे पालन न होणे, माहे एप्रिल, २०२३ ते माहे जानेवारी, २०२५ अखेरची तुटीची रुपये ९९३ कोटी इतकी रक्कम शासनाने न देणे, महामंडळाचे उत्पन्न वाढत नसल्याने शासनाकडून मिळणाऱ्या सवलत मुल्याच्या रकमेतून केवळ वेतन देणे, माहे जानेवारी, २०२५ अखेर उपदान, बँक वसुली, निवृत्तीवेतन अंशदान याकरिता रूपये ३३९८.०५ कोटी इतकी रक्कम महामंडळाने थकविणे, उत्पन्नाअभावी महामंडळाने **Employees Provident Fund and Miscellaneous Provisions Act,** 1952 च्या कलम १(३) (२) अनुसार भविष्य निर्वाह निधीचे रूपये १०११ कोटी विश्वस्त मंडळामध्ये जमा न करणे, प्रशासकीय / तपासणी शुल्क भरलेले नसल्याने छत्रपती संभाजीनगर येथील सदर संस्थेच्या प्रादेशिक आयुक्तांनी ६९१ कर्मचाऱ्यांचे वाढीव वेतनानुसारच्या निवृत्तीवेतनाचे दावे दिनांक ६ फेब्रुवारी, २०२५ रोजी फेटाळल्याचे उघडकीस येणे, अशाप्रकारे हजारो कर्मचाऱ्यांचे नुकसान होणे, कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या उपदानासाठीची रक्कम रुपये १०९९ कोटी विश्वस्त मंडळाकडे जमा न करणे, कर्मचाऱ्यांच्या वेतनातून वसूल केलेली एसटी बँकेच्या कर्जाच्या वसुलीची रक्कम रुपये १४४ कोटी बँकेला न देणे, त्यामुळे बँकेचा **NPA** ५% होणे, कर्मचाऱ्यांना नवीन कर्ज न देता बँकेने दंड आकारणे, एलआयसी व सोसायटीच्या वर्गणीची

अप्रकाशित प्रत

पगारातून वसूल केलेली रक्कम रुपये १२ कोटी जमा न केल्याने एलआयसी पॉलिसी व्यपगत होऊन कर्मचारी लाभापासून वंचित होण्याची भीती असणे, अधिकाऱ्यांना सर्व लाभ मिळत असताना कर्मचाऱ्यांच्या रजा रोखीकरणाचे रुपये १४८ कोटी थकविणे, ह्या सर्व गोष्टींना महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची भावना असणे, मागील महिन्यात १३१० बसेस भाडे तत्वावर घेण्याच्या टेंडरमधील रूपये २००० कोटींचा घोटाळा उघड झाल्याने सदर टेंडर रद्द होणे, एसटी च्या ताफ्यामध्ये स्व-मालकीच्या बसेस आवश्यक असताना भाडेकरारावरील साध्या बसेसमुळे प्रति किलोमीटर आठ ते दहा रुपयांचा तोटा महामंडळाला सोसावा लागणे, गेल्यावर्षी झालेल्या ई-बस खरेदीत प्रत्येक किलोमीटरचे **EPKM** उत्पन्न ५४ रूपये असताना कंत्राटदाराला ७८ रूपये दर देणे, यातून प्रत्येक किलोमीटरला २४ रूपयांचा महामंडळाला तोटा होणे, चार्जिंगची सुविधा नसताना बस रोज जेमतेम २०० कि.मी. चालविता येईल हे माहित असताना कंत्राटदाराला ४०० कि.मी. चे ७८ रूपयांप्रमाणे पैसे देण्याची हमी देणे, महामंडळाच्या या सर्व कामकाजामध्ये फार मोठा गैरव्यवहार झाला असण्याची चर्चा असणे, महामंडळाच्या आगार दुरुस्ती/ विकासकामाच्या निविदा संचालक मंडळासमोर बाब टिप्पणी सादर न करता आयत्या वेळी मंजूर करून घेणे, तरीही १५० आगारांमध्ये मोठया प्रमाणात खड्डे असल्याचे वृत्त निदर्शनास येणे, ह्या गंभीर स्वरूपाच्या कामकाजातील अनियमिततांची **SIT** नेमून कालबद्ध चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द गुन्हे दाखल करुन चौकशी होणेसंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

**(सोमवार, दिनांक २४ मार्च, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) [अनुक्रमांक ९ व १०]**

**(९)** **श्रीमती उमा खापरे**, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"नवी मुंबईतील तळोजा येथील ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड कंपनीतील १७५ कामगारांनी २४ वर्षे इतकी प्रदिर्घ सेवा दिल्यानंतरही त्यांना सेवानिवृत्ती नंतरही अद्याप पर्यंत नऊ कोटी रुपयांची कामगारांची देणी थकित असणे, कामगारांनी अनेक वेळा मागणी केली असता प्रशासन आणि शासनाकडून कोणतीही ठोस उपाययोजना होत नसणे, त्यामुळे कामगारांनी

आंदोलन करण्याचा इशारा दिला असणे, यामध्ये आतापर्यंत ३१ कामगारांचे वृद्धापकाळाने निधन झाले असून त्यांच्या कुटुंबियांना कोणतीही मदत मिळाली नसल्याने हे कुटुंबीय त्यांच्या हक्काचा आर्थिक मोबदला मिळण्यापासून वंचित असणे, कंत्राटी कामगार ३२५ व कायम कामगार १७५ असे एकूण ५०० कामगार न्याय मागत असताना त्यांना ८ कोटी ८६ लाख रुपये नियमानुसार मंजूर होऊनही कंपनीने दिले नसल्याने या कामगारांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, सदर कंपनीची अनेक ठिकाणी मालमत्ता असून ट्रान्सपॉवर इंजिनिअरिंग लिमिटेड या कंपनीमधून १७५ कायम कामगारांपैकी ७१ कामगारांचा तणावाखाली मृत्यू झाला असणे, उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने या कंपनीच्या मालमत्तांचे लिलाव करण्याचे आदेश दिले असतानाही त्याकडे शासन दुर्लक्ष करित असल्याने या कामगार व त्यांच्या कुटुंबियांवर मोठा अन्याय होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१०) **सर्वश्री अंबादास दानवे,** सचिन अहिर, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"आमदार निवास मुंबई तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांमध्ये सन १९८६-८७ या कालावधीत रुजू झालेल्या एकूण ३८ लिपीक टंकलेखक पदावरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतरही सलग सेवा व वेतन फरकाची रक्कम त्वरित देण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ रिट पिटीशन क्रमांक २२/२०१९, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० अन्वये शासनाला आदेश दिलेले असणे, सदर निवृत कर्मचाऱ्यांना सलग सेवा व सन १९८६ ते सन २००३ या कालावधीतील वेतन फरकाची रक्कम आजमितीस देण्यात आलेली नसणे, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक आयबीएन/ २००७/ प्र.क्र.५७/ सेवा-५, दिनांक २४ मार्च, २००९ अन्वये वरिष्ठ पद मिळण्याबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दाखल केलेली अवमान याचिका क्रमांक १३५/२००८ अन्वये नागपूर सार्वजनिक बांधकाम विभागातील ३४ कर्मचाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र. रुअआ-१५९६/ २२८/सेवा-५, दिनांक २४ एप्रिल, २००१ नुसार पदानुसार वेतनश्रेणी रुपांतरित केल्याच्या दिनांकापासून देण्यात येणे, याच धर्तीवर आमदार निवास मुंबई तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामधील वरील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना रुपांतरित केल्याच्या दिनांकापासून पदानुसार वेतनश्रेणी व फरकाची रक्कम देण्याची गरज, सदर वस्तुस्थिती विचारात घेता रिट पिटीशन २२/२०१९ मध्ये मा. उच्च न्यायालय,

मुंबई खंडपीठ यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२० रोजी शासनाला आदेश देऊनही निवृत्त कर्मचाऱ्यांना सलग सेवा व वेतन फरकाची रक्कम देण्यास होत असलेला विलंब, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करुन जाणीवपुर्वक विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन निवृत्त कर्मचाऱ्यांना सलग सेवा व वेतन फरकाची रक्कम विनाविलंब अदा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २४ मार्च, २०२५.

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

अप्रमाणित प्रत